www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-215 • Wednesday, 10 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

### अनमोल विचार

"वेळ आपला आहे हवे असल्यास सोनं करा आणि हवं असल्यास झोपेत घाला!!!"

## लक्षवेधी

### डीपी वर्ल्डच्या सीईओ यांनी 'पीएम मोदींचे केले कौतुक, केली भारतात गुंतवणुकीची घोषणा

**नवी दिल्ली** : व्हायब्रंट गुजरात ग्लोबल समिटमध्ये दुबईच्या बहुराष्ट्रीय लॉजिस्टिक कंपनी डीपी वर्ल्डचे ग्रुप चेअरमन आणि सीईओ सुलतान अहमद बिन सुलेम हे देखील सहभागी होणार आहेत. सुलतान अहमद बिन सुलेम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली, त्यानंतर त्यांनी पंतप्रधान मोदींचे भरभरून कौतुक केले. ते म्हणाले, ही एक उत्कृष्ट बैठक होती. पीएम मोदी हे अप्रतिम व्यक्ती आहेत. त्यांची ऊर्जा, दृष्टी आम्हाला प्रेरणा देते. आम्ही आमच्या गुंतवणुकीबद्दल आणि भारतामधील विस्ताराबद्दल चर्चा केली. आम्ही औद्योगिक जमीन संपादन करत आहोत. आम्ही भारतात विविध क्षेत्रात उत्पादनात गुंतवणूक करू.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केल्याने कार्ती चिदंबरम अडचणीत, काँग्रेसने पाठवली नोटिस

**नवी दिल्ली** : एका मुलाखतीमध्ये कार्ती चिदंबरम यांनी सांगितले होते की, राहुल गांधी यांच्या तुलनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अधिक लोकप्रिय आहेत. हेच विधान आता कार्ती चिदंबरम यांच्यासाठी अडचणीचे ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राहुल गांधी यांच्यापेक्षा अधिक लोकप्रिय आहेत असं म्हटल्याने तामिळनाडू प्रदेश काँग्रेसच्या शिस्तपालन समितीचे प्रमुख के. आर. रामसामी यांनी कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. तसेत त्याला दहा दिवसांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. या मुलाखतीमध्ये कार्ती चिदंबरम यांनी ईव्हीएमबाबतही विश्वास व्यक्त केला होता.

### हॉटेल, मॉल्समध्ये व्हावी अयोध्येची सजावट! भाजप नेते म्हणतात, 'विनंतीकडे दुर्लक्ष कराल...'

**नवी दिल्ली** : भारत हा देश हिंदूबहुल आहे, हे या देशातील मॉल व हॉटेलचालक विसरत आहेत का? तुम्ही जर खिसमसला सान्ताक्लॉजची आणि खिसमस ट्रीची सजावट करत असाल, तर आता तुम्ही अयोध्येतील श्रीराम मंदिराची सजावट करायला हवी. तुम्ही या विनंतीकडे दुर्लक्ष कराल, तर तुम्हाला कसे उत्तर द्यावे हे इंदूरच्या लोकांनाही माहित आहे, अशा शब्दांत इंदूरचे महापौर पुष्यमित्र भार्गव यांनी शहरातील मॉल व हॉटेलचालक यांना 'प्रेमळ धमकी' दिली आहे. २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिराच्या उभारणीमुळे इंदूरमध्येही अनेक स्तरांवर कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या संदर्भात भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर संघटनांचे नेते लोकांना आवाहन करत आहेत की त्यांनी सर्वत्र प्रभू रामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा करावा.

### राहुल गांधी यांच्या यात्रेला परवानगीची प्रतीक्षा; केंद्र सरकारकडे पाठवला अर्ज

**नवी दिल्ली** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रेचा प्रारंभ मणिपूरहून होणार आहे. त्यासाठीचा १४ जानेवारी हा मुहूर्त जवळ येऊन ठेपला आहे. मात्र, यात्रेच्या प्रारंभासाठी अद्याप मणिपूर सरकारकडून परवानगी मिळाली नसल्याचे मंगळवारी काँग्रेसकडून सांगण्यात आले. काही महिन्यांपूर्वी राहुल यांनी भारत जोडो यात्रा काढली. ती लक्षवेधी आणि मोठ्या चर्चेचा विषय ठरली. आता त्या यात्रेच्या दुसऱ्या आवृत्तीसाठी राहुल आणि काँग्रेसजन सज्ज झाले आहेत. मात्र, यात्रेच्या प्रारंभासाठी काँग्रेसला अद्याप परवानगीची प्रतीक्षा असल्याचे स्पष्ट झाले. त्याविषयीची माहिती पक्षाचे ज्येष्ठ नेते के.सी.वेणुगोपाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### 22 जानेवारीला सर्व शाळा-महाविद्यालये, दारूची दुकाने बंद; योगी सरकारचे आदेश

**नवी दिल्ली** : श्री रामलला प्राण-प्रतिष्ठा सोहळा 22 जानेवारी रोजी उत्तर प्रदेशात 'राष्ट्रीय उत्सव' म्हणून साजरा केला जाणार आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 22 जानेवारीला शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर केली आहे. प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी राज्यात मद्यविक्री होणार नाही, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी जारी केले आहेत. अयोध्येत पर्यटकांना अविस्मरणीय आदरातिथ्य मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी आदेशात म्हटले आहे. तसेच 22 जानेवारीला सर्व शासकीय इमारती सजवाव्यात आणि फटाक्यांचीही व्यवस्था करावी. अयोध्येत स्वच्छतेचे 'कुंभ मॉडेल' राबवा, असे म्हंटले आहे.

### भारत-मालदीव वादावर मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, 'पीएम मोदी सर्व काही वैयक्तिकरित्या घेतात'

**नवी दिल्ली** : भारत आणि मालदीवमधील राजनैतिक वाद सध्या सुरू आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी इमोशनल फोबिया क्रिएट करतात, असे म्हणत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी टोला हाणला आहे. मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व काही वैयक्तिकरित्या घेत आहेत. आपण आपल्या शेजाऱ्यांशी चांगले संबंध ठेवले पाहिजेत. वेळेनुसार काम केले पाहिजे. नरेंद्र मोदी इमोशनल फोबिया क्रिएट करतात.' दरम्यान, मालदीवच्या युवा मंत्रालयातील उपमंत्री मालशा शरीफ, मरियम शिउना आणि अब्दुल्ला महझूम मजीद यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या लक्षद्वीप दौऱ्यावर भाष्य केले होते.

### लक्षद्वीपमधील पर्यटन वाढणार ! 'या' बेटावर होऊ शकते नवीन विमानतळ

**नवी दिल्ली** : मालदीवसोबत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भारत सरकार लक्षद्वीपच्या मिनिकॉय बेटावर नवीन विमानतळ बांधण्याचा विचार करत आहे. या विमानतळाच्या निर्मितीमुळे लक्षद्वीपमधील पर्यटन वाढण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे हे नवीन विमानतळ नागरी आणि लष्करी उद्देशासाठी असेल आणि नागरी विमानांसोबतच लष्करी विमानेही येथून चालवता येतील. मिनिकॉय बेटावर नवीन विमानतळ बांधण्याचा प्रस्तावही सरकारने यापूर्वी दिला होता. मात्र आता हा प्रस्ताव बदलून संयुक्त विमानतळ म्हणून विकसित करण्याची तयारी सुरू आहे.

# आमदार अपात्रतेसंबंधीचा निकाल असा असणार का ?.. थोडी खुशी, थोडा गम !



## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयावर संपूर्ण देशाच्या नजरा

**■मुंबई। यश सावंत,**

आमदार अपात्रतेसंबंधी अध्यक्ष काय निकाल देतात हे जरी महत्त्वाचं असलं तरी हा निकाल थोडी खुशी थोडा गम अशा प्रकारचा असू शकतो. सत्ता संघर्षाबाबद ज्या गटाला वाटतं असेल त्या गटाला उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात दादा मागता येईल, असं मत ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी मांडलं आहे. शिवसेना आमदार अपात्रतेची विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरू होती. या सुनावणीचा निकाल बुधवारी १० जानेवारी रोजी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण देशाच्या नजरा या मोठ्या राजकीय घडामोडींकडे लागल्या आहेत.

निकाल देताना घटनापीठाच्या निर्णयानुसार अध्यक्ष निर्णय देतील. घटनापीठाच्या निर्णयानंतर अध्यक्ष टिपाटिपणी करू शकतात. जर गटाला वाटलं अध्यक्षाची टिपाटिपणी योग नाही तर ते दाद मागू शकतात. निकालाबाबद अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालय कधी देईल हे सांगता येत नाही, कारण न्यायालयाला दोन्ही बाजू पुन्हा ऐकूण घ्याव्या लागतील. मात्र या निकालानंतर पुन्हा घटनापीठ स्थापन करण्याची गरज नाही.

या निकाल पत्रात राजकीय पक्षात कुठल्या पक्षाच्या अध्यक्षाला व्हीप जारी करण्याचा अधिकार आहे हे महत्त्वाचं आहे. न्यायालयाने अध्यक्षांना तपासण्याचा अधिकार दिला आहे. त्यानुसार कोणत्या गटाच्या अध्यक्षाचा व्हीप रेकॉर्डिंग झाला हे महत्त्वाचं आहे. त्यामुळे न्यायालयाने जो निर्णय दिला आहे, त्या निर्णयाला अधीन राहून अध्यक्ष आपले स्वतंत्र मत नोंदवू शकतात. त्यावर निकाल काय येतो हे पाहणं महत्त्वाचं आहे. न्यायालयाने स्पष्ट सांगितलंय सुनील प्रभू हे त्यावेळी अधिकृत प्रतोत होते नंतर भरत गोगावले यांची नियुक्ती रद्द केली. मात्र न्यायाल्याने एक मुभा दिली आहे की कोणत्या गटाच्या प्रतोदाची रेकॉर्डिंगवर नोंद झाली त्या गटाची बाजू अध्यक्ष घेऊ शकतात, असं निकम यांनी म्हटलं आहे.

## पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार स्वीकारताच रश्मी शुक्ला ॲक्शन मोडवर

**■मुंबई । विशाल कारंडे,**

मंगळवारी रश्मी शुक्ला यांनी महाराष्ट्र पोलीस महासंचालक पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्याच्या दिवशी रश्मी शुक्ला यांनी आपल्या कामाचे काही लक्ष्य ठेवले. आपल्या पदभार घेण्याचा पहिला दिवस असल्याचं त्या म्हणाल्या. कायदा व सुव्यवस्था महिला सुरक्षा प्राथमिकतेवर असेल. सायबर गुन्हेगारी कमी करण्याकडे देखील लक्ष देणार. महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी काम करणार असल्याचं त्या पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या.

महाराष्ट्र पोलीस महासंचालकाचा अतिरिक्त पदभार असलेले मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडून रश्मी शुक्ला यांनी पदभार स्वीकारला. रश्मी शुक्ला राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक आहेत. रश्मी शुक्ला यांनी सशस्त्र सीमा बलाच्या प्रमुख म्हणून त्यांनी काम केलं आहे. याआधी शुक्ला यांनी राज्य गुप्तचर विभागाच्या प्रमुख तसेच पुणे पोलीस आयुक्त राहिल्या आहेत. त्या १९८८ बॅचच्या आयपीएस अधिकारी आहेत.



महाराष्ट्रात येऊन बर वाटतंय हे घर आहे कारण ३३ वर्ष येथे काम केलंय. महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था कायम चांगली असते. महिलांची सुरक्षितता आमचं महत्वाचं ध्येय असेल. त्याचप्रमाणे सायबर क्राईमवर देखील आमचं विशेष लक्ष असेल.

## न्यायमूर्ती आरोपीला भेटतात ? राहुल नार्वेकर, एकनाथ शिंदे भेटीवर उद्धव ठाकरे यांचा घणाघात

**■मुंबई। दिगंबर जाधव,**

राहुल नार्वेकर यांनी निकालाचे काम जवळपास पूर्ण केले आहे. या निकालापूर्वी लवाद म्हणजे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटी झाली. या भेटीवर उद्धव ठाकरे यांनी घणाघात केला आहे.

दोन वेळा झालेली ही भेट म्हणजे लोकशाहीची हत्या आहे. आम्ही सर्वोच्च न्यायालयात हे निर्देशनास आणून दिले आहे. आम्ही कालच यासंदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल केले



आहे. परंतु जनतेच्या न्यायालयातही ही लक्षात आणून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. उद्या वेडावाकडा निकाल आला तर...या शब्दांत उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले.

लवादाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर उद्या रात्रीपर्यंत निकालासाठी वेळ घेतील. कदाचित त्यापेक्षा जास्त वेळ ते काढतील. ते लवाद म्हणून बसले आहेत. परंतु दोन वेळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाऊन भेटले. हा प्रकार म्हणजे न्यायामूर्ती आरोपींना जाऊन भेटण्यासारखा हा प्रकार आहे. आम्ही काल तावडतोब हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्दशनास ही बाब लक्षात आणून दिली आहे. यासंदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. न्यायामूर्तीच्या भूमिकेत नार्वेकर आहेत आणि आरोपी असलेले एकनाथ शिंदे त्यांना भेटले आहे.

## आंबा काजू बोडार्साठी तेराशे कोटी रुपयांची तरतूद, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा



**■चिपळूण। सचिन कदम,**

कोकणासाठी आंबा काजू बोर्ड आपण स्थापन केला असून यासाठी पाच वर्षासाठी तेराशे कोटी रुपयांची तरतूद केल्याची महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. कोकणासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हॅलो पर्यटन स्थळांसाठी भरघोस निधी देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. सिंधुदुर्ग ते मुंबई ग्रीनफिल्ड ऍक्सिस सुपर एक्स्प्रेस मार्गासाठी डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी घेतलेल्या निर्णयांची त्यांनी यावेळी माहिती दिली.

दापोली तालुक्यात हर्णै येथे उद्योग विभागामार्फत मरीन पार्कची ही घोषणा त्यांनी केली.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसंकल्प यात्रेच्या आयोजित मेळाव्यात राजापूर येथे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री उदय सामंत,ना.दिपक केसरकर, रवींद्र फाटक आदी मान्यवर उपस्थित होते.

## बिल्किस बानो प्रकरणी न्यायालयाच्या निर्णयावर शरद पवार म्हणतात...

**■पुणे। अभिजीत येरल्लू,**

देशाला हादरवून सोडणाऱ्या बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने महत्वपूर्ण निर्णय देत ११ गुन्हेगारांची शिक्षा माफ करण्याचा गुजरात सरकारचा निर्णय रद्द ठरवला. या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारचा चांगलाच समाचार घेतला आहे. हा गुन्हा जरी गुजरातमध्ये घडला असला, तरी महाराष्ट्रात या प्रकरणी आरोपींवर खटला चालवून त्यांना शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यामुळे गुजरात सरकारला आरोपींची शिक्षा माफ करण्याचा अधिकार नाही, असे न्यायालयाने म्हटले होते.



या न्यायालयाच्या निर्णयावर आता राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी महाराष्ट्र सरकारने बिल्किस बानोला न्याय द्यावा. अशी विनंती केली आहे. आज माध्यमांशी संवाद साधताना शरद पवार यांनी, बिल्किस बानो प्रकरणात काल सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आणि त्या भगिनीला न्याय देण्याचं काम केलं.

## रेल्वे भरती प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणात सीबीआयची १२ ठिकाणी छापे

**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

पश्चिम रेल्वेच्या रेल्वे भरती केंद्राद्वारे आयोजित केलेल्या सामान्य विभागीय स्पर्धा परीक्षेच्या (जीडीसीई) प्रश्नपत्रिका फुटीशी संबंधित प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मुंबईसह सुरत, अमरेली, नवसारी, बक्सर अशा १२ ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईमध्ये सीबीआयच्या पथकांनी महत्वाची कागदपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त केले आहेत. पश्चिम रेल्वेने दिलेल्या तक्रारीवरून, रेल्वे भरती केंद्राद्वारे घेण्यात आलेल्या सामान्य विभागीय स्पर्धा परीक्षेच्या (जीडीसीई) प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोपाखाली रेल्वेचे काही अधिकारी आणि मुंबईतील




एका खाजगी कंपनीच्या अज्ञात अधिकार्यांसह अन्य संबंधितांविरोधात सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे. व्हॉट्स ॲपवर काही उमेदवारांकडे प्रश्नपत्रिका उपलब्ध होती, असा आरोप आहे. जीडीसीईच्या कोट्यातून ३ जानेवारी २०२१ रोजी रेल्वेमध्ये बिगर-तांत्रिक श्रेणी (नॉन ग्रॅज्युएट), कनिष्ठ लिपिक/टायपिस्ट आणि प्रशिक्षित लिपिक या पदासाठी संगणक आधारित परीक्षा घेण्यात आली होती.

## घरात पोलिसांची धाड, छाप्यात बंदुका बनवण्याचे साहित्य अन् तलवारींसह वाघनखांचा मोठा साठा जप्त



**■रायगड। विशाल पाटील,**

कोकणातील रायगड जिल्ह्यात रोहा शहरात एका युवकाच्या घरात शस्त्रास्त्रांचा मोठा साठा सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. सोमवार दिनांक ८ जानेवारी रोजी खळबळ उडाली आहे. सायंकाळी ७ ते ८ वाजण्याच्या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने काही संशयित ठिकाणी छापेमारी केली आणि मोठं घबाड पोलिसांच्या हाती लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोहा शहरातील धनगर आळी येथील रहिवासी तन्मय सतीश भोगटे (२४) याच्या घरात पोलिसांनी छापा मारला. यावेळी मोठ्या प्रमाणात बंदूका बनवण्याचे साहित्य, २ रिव्हॉल्व्हर आणि बंदुकांची जिवंत काडतूसे, मोठा दारुगोळा आणि त्याचबरोबर वन्य प्राण्यांची अवशेष घरामध्ये सापडले. पोलिसांनी तात्काळ आरोपी तन्मय भोगटे याला मुद्देमालासह जेरबंद केलं आहे. अशा प्रकारची शस्त्रास्त्र रोहा शहरात पहिल्यांदाच सापडली आहेत. मात्र या घटनेने शहरात घबराटीचे वातावरण पसरले आहे. ही कारवाई रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे बाळासाहेब खाडे आणि त्यांच्या टीमने केली.

## मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हर, गॅलेक्सी रुग्णालयात करण्यात आलं दाखल



**■नवी मुंबई। भावना जैन,**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हर झाल्याने म्हणजेच त्यांना ताप आल्याने त्यांना गॅलेक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तापामुळे त्यांना अशक्तपणा आला आहे अशी माहिती डॉक्टरांनी दिली. त्याचप्रमाणे त्यांच्या उजव्या पायाला लागलं आहे असंही डॉक्टरांनी सांगितलं.

काय म्हणाले डॉक्टर?

मनोज जरांगे पाटील यांना माऊथ अल्सर झाला आहे. तसंच उजव्या पायाला जखम झाली आहे. त्यांच्या सगळ्या चाचण्या केल्या आहेत. तसंच उपचारही सुरु केले आहेत. मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हरही आहे. आता चाचणीचा अहवाल आल्यानंतर पुढचं चित्र स्पष्ट होईल. काळजी करण्यासारखं सध्यातरी काही नाही असं डॉक्टर विनोद तावरे यांनी म्हटलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन उभं केलं आहे.

## निर्णय देणाऱ्या व्यक्तीने ज्याची केस त्याच्याच घरी जाणं हे संशयास्पद – शरद पवार



**■ठाणे, अनिकेत भंकाळ,**

शिवसेनेतील आमदारांच्या अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांसमोर आलेल्या सुनावणीचा निकाल येण्यासाठी अवघे काही तास शिल्लक आहेत. या निकालापूर्वी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म ुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या वर्षा या निवासस्थानी जाऊन भेट घेतली होती. ही भेट सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी ही भेट नैतिकदृष्ट्या कितपत योग्य आहे, याबाबत शंका उपस्थित केली आहे. ते मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी शरद पवार यांनी म्हटले की, ही साधी आणि सरळ गोष्ट आहे की, ज्यांच्यापुढे केस आहे आणि ज्यांची केस आहे त्यांनी अशाप्रकारे भेटणे योग्य नाही.

ज्यांची केस आहे त्यांनी निर्णय घेणाऱ्या व्यक्तीसमोर आपली बाजू मांडणे चूक नाही. पम ज्यांच्यासमोर बाजू मांडली जात आहे, ज्यांचा निर्णय अभिप्रेत आहे, ते गृहस्थ ज्यांची केस असेल त्यांच्याकडे जात असतील तर संशयाला जागा निर्माण होते. तसे केले नसते तर विधानसभा अध्यक्षांची प्रतिमा चांगली राहिली असती, असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर बुधवारी दुपारी चार वाजता विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात शिवसेनेतील आमदारांच्या अपात्रतेबाबत अंतिम निकाल देणार आहेत.

## जरांगे पाटील यांना मुंबईत आंदोलन करण्यापासून रोखण्याचे आदेश द्या, मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका

**■मुंबई। नितीन देवळेकर,**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील २० जानेवारी रोजी मुंबईत आंदोलन करणार आहेत. त्यासाठी त्यांनी राज्यभरातील मराठा तरूणांना ट्रॅक्टर्स, विविध वाहनांसह मुंबईत दाखल होण्यास सांगितले आहे. मात्र, मुंबईमध्ये जरांगे यांनी हे आंदोलन केल्यास कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे, जरांगे पाटील यांना हे आंदोलन करण्यापासून रोखण्याचे आदेश देण्याच्या मागणीसाठी फौजदारी स्वरूपाची जनहित याचिका सोमवारी उच्च न्यायालयात करण्यात आली.

जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन पुकारून ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या आंदोलनामुळे राज्यातील शांततेचे वातावरण कलुषित होत आहे. शिवाय, दोन समाजात परस्पराविरोधात असंतोष निर्माण झाला आहे.

या सगळ्या परिस्थितीला जबाबदार असलेल्या जरांगे यांच्यावर शांततेचा भंग करणे, सार्वजनिक हितास धक्का पोहोचवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे



आदेश देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते हेमंत पाटील यांनी ही याचिका केली आहे. मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

# मालदीवचे दिवाळखोर



भारताने बाजारपेठेची ताकद या प्रकरणात दाखवून दिली हे बरे झाले. मालदीवचे राज्यकर्ते त्यापासून बोध घेतील, तर बरे.

मालदीवमध्ये गेल्या नोव्हेंबरमधील निवडणुकीत भारताकडे कल असलेल्या 'मालदीव डेमोक्रॅटिक पक्षा'च्या (एमडीपी) इब्राहिम सोहिल यांना पराभूत करून 'पीपल्स नॅशनल काँग्रेस'चे (पीएनसी) मोहम्मद मुज्झू सत्तेवर आले.

मुज्झू यांना 'प्रोग्रेसिव्ह पार्टी ऑफ मालदीव'चे (पीपीएम) भारतविरोधी माजी अध्यक्ष अब्दुल्ला यमीन यांची साथ लाभली. त्यावेळी मुज्झू यांनी सार्वभौमत्वाची भाषा करीत 'इंडिया आऊट'चा डंका पिटला होता. भारतविरोधाचे विष मुज्झू आणि त्यांच्या सहकारी मंत्र्यांच्या नसानसांत किती भिनले याचे प्रत्यंतर नुकतेच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात त्यांनी जी गरळ ओकली, त्यावरून आले.

पंतप्रधानांनी 'लक्षद्वीपला मालदीव चांगला पर्याय' असे विधान केले होते. मुज्झू यांच्या मंत्रिमंडळातील मरियम शिउना, मलाशा शरीफ आणि अब्दुल्ला महझूम माजिद यांनी पंतप्रधान मोदींबाबत आक्षेपार्ह टिपणी केली. ही विधाने लोकशाही संकेतांना तसेच राजशिष्टाचाराला तिलांजली देणारी आहेत. मोदी यांनी काय गैर विधान केले? सार्वभौमत्व तुम्हांला आहे तसेच भारतीयांनाही आहे.

परदेशातच पर्यटनाची अपूर्वाई शोधणाऱ्या भारतीयांना त्यांच्या पंतप्रधानांनी दिलेला सल्ला उलट मननीय असाच आहे. आपल्याकडे अशी अनेक पर्यटनस्थळे देशभर विखुरलेली आहेत की, त्याचा पर्यटनविकासासाठी फारसा विचार झाला नाही. भारताने कडक आणि ताठर भूमिका घेतल्यानंतर मालदीवने 'डॅमेज कंट्रोल' म्हणून या तीनही मंत्र्यांना निलंबित केले. त्यांची विधाने ही सरकारची भूमिका नाहीत, अशी सारवासारव केली.

तथापि, या घटनेने मालदीवमधील सत्तांतरानंतर उभय देशांमधील ताणलेल्या संबंधाला आणखी टोकाला नेले, हेच खरे. हिंद महासागरातल्या मालदीवला सामरिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. चीनपेक्षाही भारतापासून अगदी हाकेच्या अंतरावरील मालदीवचे अर्थकारण पर्यटनव्यवसायावर चालते. उत्तम दर्जाचे आदरातिथ्य, विनम्रशीलता, सेवाभावी वृत्ती, गुणवत्तापूर्ण, उच्च दर्जाची सेवासुविधा हे पर्यटनव्यवसायाचे वैशिष्ट्य.

मालदीवला भेट देणाऱ्यांत भारतीयांचा सरासरी वाटा पंधरा-वीस टक्क्यांचा आहे. तथापि त्याची तमा न बाळगता, विनम्रतेचे भान सोडून बेछूट विधाने तेथील मंत्र्यांनी पंतप्रधान मोदींबाबत करणे आक्षेपार्ह आणि गैरच आहे. आता मालदीवने सारवासारव केली असली तरी भारताने त्यांना धडा शिकवला पाहिजे. या वादग्रस्त भूमिकांनंतर हजारो भारतीयांनी मालदीवच्या सहली रद्द करून त्यांना त्यांची जागा दाखवली, हे उत्तम झाले.

मालदीवचे अध्यक्ष सत्तेवर येताच भारताला पहिल्यांदा भेट देतात, असा संकेत आहे. तथापि, ह्यइंडिया आऊटह्चा घोषा लावलेल्या मुज्झूंनी पहिल्यांदा तुर्कियेला भेट दिली, त्यानंतर 'बेल्ट अँड रोड'चा पाश आवळून मालदीवला कर्जाच्या खाईत लोटणाऱ्या चीनला भेट देऊन आणाभाका घेतल्या. दुसरीकडे भारताने दिलेले लष्करी साहित्य, हेलिकॉप्टर आणि भारतीय जवान परत पाठवण्याची भाषा चालवली.

मालदीव परिसरातील समुद्रतळाचा आणि तेथील भौगोलिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी मालदीव आणि भारत यांच्यातील येत्या जूनमध्ये संपणाऱ्या 'जलविज्ञान सहकार्य करारा'ला मुदतवाढ देण्यास नकार दिला. श्रीलंकेत झालेल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या बैठकीला भारतासह श्रीलंका, मॉरिशसचे प्रतिनिधी उपस्थित होते; पण मालदीवची अनुपस्थिती खटकणारी होती. थोडक्यात, भारतद्वेषाने मालदीवचे सत्ताधारी पछाडलेले आहेत.

त्याचे प्रतिबिंब पंतप्रधानांवरील टीकेत उमटले. मात्र, त्यांना तेथील विरोधकांनी वास्तवाची जाणीव करून देत, भारताशी पंगा घेऊ नका, हा दिलेला मोलाचा सल्ला त्यांनी लक्षात घ्यावा. भारताने मालदीवला वेळोवेळी भरपूर मदत केली आहे.

याउलट चीनचे प्रेम हे पुतनामावशीचे प्रेम आहे, याची जाणीव तेथील राज्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे. बाजारपेठेची ताकद आपण या प्रकरणात दाखवून दिली हे बरे झाले. आता मालदीवशी संबंध सुरळित करण्यासाठी राजनैतिक कौशल्य दाखवावे लागेल.

# SUPERFOOD CAMU CAMU : KNOW THESE 5 BENEFITS OF THIS HAWAIIAN HERBAL



Nestled in the lush rainforests of the Amazon rainforest, camu camu thrives as a vibrant green shrub. This unassuming berry, native to the Amazon basin and Hawaii, packs a powerful punch when it comes to nutrition. In recent years, it has gained recognition as a superfood, lauded for its exceptional vitamin C content and a plethora of other health benefits. So, what makes camu camu such a nutritional marvel? Here are 5 reasons to consider incorporating this Hawaiian herbal wonder into your diet. A potent immune boost: Camu Camu stands tall as one of the richest sources of vitamin C, surpassing even the levels found in citrus fruits. Vitamin C, a powerful antioxidant, serves as a cornerstone for a robust immune system. Regular consumption of Camu Camu can fortify your body's defence mechanisms, aiding in the prevention of common illnesses and promoting overall wellness. Neutralising free radicals: Beyond its vitamin C abundance, Camu Camu boasts a diverse range of antioxidants, including flavonoids and polyphenols. These compounds play a crucial role in neutralising free radicals, reducing oxidative stress, and mitigating inflammation. By integrating Camu Camu into your diet, you provide your body with potent tools to combat cellular damage and reduce the risk of chronic diseases. Elevating mental well-being: Studies suggest that Camu Camu may contribute to mood enhancement, thanks to its high vitamin C content. Vitamin C plays a role in neurotransmitter synthesis, including serotonin and dopamine, which are linked to mood regulation. Additionally, the antioxidant-rich nature of Camu Camu may support cognitive function, potentially offering protection against age-related cognitive decline. A natural elixir for radiant skin: The synergy of vitamin C and antioxidants in Camu Camu extends its benefits to skin care. Vitamin C is vital for collagen synthesis, promoting skin elasticity and diminishing the appearance of wrinkles. The antioxidants in Camu Camu act as a shield against UV-induced damage and environmental pollutants, making it a healthy approach to achieving and maintaining healthy, radiant skin. Nurturing holistic health: Long-term inflammation lays the groundwork for several health problems, including but not limited to arthritis and cardiovascular illnesses. Camu Camu's anti-inflammatory properties make it a valuable ally in promoting joint health and reducing the risk of chronic conditions. By embracing Camu Camu, individuals can contribute to a more balanced and inflammation-resistant internal environment.

# बद्धकोष्ठतेची समस्या तुम्हाला वारंवार त्रास देत असेल, तर खाण्यास सुरुवात करा ही भाजी

आम्लपित्त आणि बद्धकोष्ठता या सामान्य समस्या झाल्या आहेत. चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे अशा समस्या वाढत आहेत. बद्धकोष्ठता दीर्घकाळ राहिल्यास मूळव्याध होण्याचा धोका असतो. त्यामुळे बद्धकोष्ठता आणि गॅसच्या समस्येवर योग्य वेळी उपचार करणे गरजेचे आहे. काही लोक तासन्तास टॉयलेटमध्ये बसतात, पण त्यांचे पोट साफ होत नाही. हे देखील बद्धकोष्ठतेचे लक्षण असू शकते.

बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी औषधे घेण्यासोबतच आहाराचीही काळजी घेणे गरजेचे असल्याचे आरोग्य तज्ज्ञ सांगतात. विशेषतः बद्धकोष्ठतेच्या बाबतीत सुरणाच्या भाजीचा अवश्य समावेश करा. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या बऱ्याच प्रमाणात टाळता येते. चला जाणून घेऊया सुरणाची भाजी कशी फायदेशीर आहे. सुरणामध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक आढळतात. त्यात कॅल्शियम, आहारातील फायबर, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम असते, जे तुमच्या शरीराला पोषण पुरवू शकते. या प्रकारच्या आहाराचे सेवन केल्याने बद्धकोष्ठतेच्या वेळी आतड्यांसंबंधीच्या समस्येवर मात करता येते. यासोबतच वेदना आणि सूज यापासूनही आराम मिळतो. आयुर्वेदातही सुरणाचे अनेक फायदे सांगितले आहेत.

सुरणाची भाजी बनवून खाणे हा देखील आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. सुरणाची भाजी तयार करण्यासाठी, प्रथम सुरण पूर्णपणे सोलून घ्या, लहान आकारात कापून घ्या आणि उकळवा. जर तुम्ही सुरण उकळले नाही, तर तुम्हाला घशात खाज येण्याची




समस्या देखील होऊ शकते. उकडलेले सुरण चांगले मॅश करा आणि त्यात मोहरीचे तेल, लिंबाचा रस, मोहरीची पेस्ट आणि हिरव्या मिरच्या घालून मिक्स करा.

बद्धकोष्ठतेच्या समस्येवर हळदही खूप फायदेशीर ठरते. हळदीमध्ये कर्क्यूमिन आणि अँटीऑक्सिडंट्स आढळतात, जे ॲसिड रिफ्लक्स आणि जळजळ कमी करून पचनास मदत करते. हळदीचा चहा प्यायल्यानेही पोट साफ होण्यास मदत होते.

# शिवानी रांगोळेनं पहिल्या मकरसंक्रांतीच्या आठवणींना दिला उजाळा



अभिनेत्री शिवानी रांगोळे हिने अभिनय कौशल्याच्या जोरावर मराठी कलाविश्वात ओळख मिळवली. बालकलाकार म्हणून तिने अभिनय क्षेत्रातील कारकीदीर्ला सुरुवात केली. शिवानीने अनेक मालिकांमध्ये काम केले आहे. 'बन मस्का' या मालिकेमुळे शिवानीला लोकप्रियता मिळाली.

या मालिकेमुळे ती घराघरात पोहोचली. सध्या ती 'तुला शिकवीन चांगलाच धडा' या मालिकेतून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. २०२४चा पहिला सण आणि त्यात लग्नानंतरची पहिली संक्रांत ही नेहमी खास असते. झी मराठीची मालिका 'तुला शिकवीन चांगलाच धडा' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अक्षराची ही दुसरी मकरसंक्रांत आहे आणि त्या निमित्ताने शिवानी रांगोळेने आपल्या लग्नानंतरच्या पहिल्या मकर संक्रातीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

शिवानी रांगोळे हिने सांगितले की,विराजस आणि माझ्या लग्नानंतरच्या पहिल्या मकरसंक्रांतला आम्ही हलव्याचे दागिने घालून छान फोटोशूट केला होता. ह्या वर्षी विराजस त्याच्या नाटकाच्या प्रयोगात व्यस्त आहे आणि मी 'तुला शिकवीन चांगलाच धडाच्या' शूटिंग मध्ये, पण जर आम्हाला सुट्टी मिळाली तर आम्ही आईच्या हातचं स्वादिष्ट जेवण जेवायला घरी पुण्याला जाऊ. मकरसंक्रांतची अस्सल मज्जा आमच्या पुण्याच्या घरच्या गच्चीवर येते तिथे आम्ही मस्त पतंग उडवतो.

# तावडे सिस्टर्सने सांगितला त्यांचा मकरसंक्रांतीचा प्लॅन; यंदाची संक्रांत खुशबू-तितिक्षासाठी आहे खास



अभिनेता जानेवारी महिना उजाडला की महिलावर्गाला वेध लागतात ते मकरसंक्रांतीचे. मग संक्रांतीचं हळदीकुंकू करणे, तिळगुळाचे लाडू करणे, लहान मुलांचं बोरन्हाणं करणे असं बरंच काही स्त्रिया करतात. विशेष म्हणजे यात लग्न झालेल्या नव्या जोडप्याचं पहिली मकरसंक्रांत असेल तर विचारायची सोयच नाही. त्यामुळे या सणाशी निगडीत प्रत्येकाकडेच अनेक आठवणी, किस्से असतात. यात सेलिब्रिटी सुद्धा मागे नाहीत. नुकतंच मराठी कलाविश्वातील लाडक्या बहिणींची जोडी खुशबू तावडे आणि तितिक्षा तावडे यांनी यंदा त्या मकरसंक्रांत कशी साजरी करणार हे सांगितलं आहे. खूप खास आहे ही मकरसंक्रांत आमच्यासाठी कारण नवीन घरात पहिला सण आणि वर्षाचा ही पहिला सण आहे. नवीन घरात मार्गशीर्षातल्या गुरुवारी स्थलांतर केले. हंगाम बदलतो त्यासोबत खाण्या-पिण्याच्या सवयी ही बदलतात. तीळ आणि गुळाचा खाण्यात समावेश होतो.

# "सुषमा अंधारे मला सख्ख्या बहिणीसारख्या", आपल्या भावना व्यक्त करत किरण माने म्हणाले..



मराठमोळे अभिनेते किरण माने यांनी शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या गटता प्रवेश केला. त्यांनी शिवबंधन बांधत त्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला आहे. सुषामा अंधारे यांच्या माध्यमातून ठाकरे गटात प्रवेश केला. सुषमा अंधारे यांच्याबद्दल बोलताना किरण माने म्हणाले की, सुषमा अंधारे मला सख्खा बहिणीसारख्या आहेत. माल 'मुलगी झाली हो' या मालिकेतून काढून टाकण्यात आलं त्यावेळी माझी आणि सुषमा अंधारे यांची ओळख नव्हती. तरीदेखील त्यांनी मला न्याय मिळावा यासाठी माझ्यासोबत सगळीकडे फिरत होत्या.

त्या प्रचंड प्रयत्न करत होत्या. अभिनेता किरण माने यांनी ठाकरे गटात प्रवेश केल्यानंतर त्यांनी फेसबुक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये त्यांनी सुषमा अंधारे यांच्या बद्दल भाष्य केलं. किरण माने यांनी लिहिलं आहे की, मला बहिणीसारख्या असलेल्या सुषमा अंधारेताईंनी 'मातोश्री'वर बोलावले तेव्हापासून काळीज धडधडायला लागलंवतं !

## HEALTH AND SPORTS

### YOU'LL NEVER SEE VIRAT KOHLI SKIP TEST CRICKET TO GO PLAY BBL: SA LEGEND OUTLINES HARSH REALITY OF COUNTRY VS T20 DEBATE



**Dubai:** Virat Kohli's love for Test cricket is the stuff of legends. And there is little doubt that the same dedication and passion is what made him India's most successful Test captain. Under Kohli, Indian cricket reached great heights, finishing with the ICC Test mace five years in a row, winning a first-ever Test series in Australia and reaching the final of the inaugural World Test Championship. India under Kohli in Tests were a different breed altogether – untouchable and home and a real, genuine threat overseas. But while in India, Test cricket thrived under Kohli, the same cannot be said for the current generation of South African cricketers. Cricket South Africa's decision to send a second-string squad to New Zealand for a Test series and reserve the top-flight players for the SA20 has created quite a storm in the cricket fraternity around the world. Australia great and former captain Steve Waugh termed it as the first step towards death of Test cricket, once again igniting the country vs T20 debate. One of South Africa's greatest ever, Brian McMillan weighed in on the saga and expressed disappointment over the direction in which cricket in South Africa is heading. McMillan is old school, and like many for his generation, nothing beats the grind of Test cricket; hence, it was no surprise to see one of the best all-rounders of the 1990s, support the traditional format. He pointed out that while T20 is important for players, nothing should come at the cost of sacrificing the ultimate test.

### VIRAT KOHLI'S KING-SIZED REMARK ON MOHAMMED SHAMI AS INDIA'S WC HERO HONOURED BY PRESIDENT MURMU AT SPORTS AWARDS




**NEW DELHI :** In a regal ceremony, Shami was greeted with rapturous applause when the star cricketer arrived to collect the Arjuna award at the Rashtrapati Bhawan. Taking to Instagram after the National Sports Awards, Shami shared a video to express gratitude. Pacer Shami was congratulated by several members of the cricket fraternity. Leading the tributes on social media, senior batter Kohli posted a special message for Shami. Legendary Indian opener Virender Sehwag, ex-India all-rounder Irfan Pathan and last year's winner Shikhar Dhawan also lauded Shami on social media. "Today I am feeling very proud that I have been honoured with the prestigious Arjuna Award by the President. I want to thank all those people who have helped me a lot to reach here and have always supported me in my ups and downs... thanks to My Coach, BCCI, teammates, family, and staff and big thanks to my fans. Thanks for recognising my hard work. I will always try to give my best to make my country proud... Again thanks to everyone..Congratulations to other Arjun award winners," Shami said. Shami was added to Team India's playing XI after vice-captain Hardik Pandya picked up an ankle injury. The fast bowler became the highest wicket-taker for India at the World Cup last year. Pacer Shami is also the fastest bowler to take 50 wickets in the history of the ODI World Cup. The speed merchant was ruled out of the entire South Africa series due to an ankle injury. The recovering pacer is also not named in India's squad for the Afghanistan T20I series.

### 'ROHIT IS ASKING FOR THE IMPOSSIBLE...': GAVASKAR USES INDIA CAPTAIN'S REMARKS TO TAUNT ENGLAND BEFORE TEST SERIES



**NEW DELHI :** Trust Sunil Gavaskar to be the first to call out the double standards of the Old Powers - as he refers to the cricketing nations of England and Australia. The legendary cricketer has always been vocal when Indian cricket or cricketers have been criticised unnecessarily. Former cricketers of England and Australia and their media often act as the '12th man' whenever they tour India. Often, the pitches in India are their biggest talking point. That is where the problem lies, feels Gavaskar. After what transpired during India's recent tour of South Africa, where run-scoring was as difficult as it gets because of pitches heavily loaded in favour of the fast bowlers, India captain Rohit Sharma landed counterpunches at a press conference in Cape Town. Rohit said he doesn't have any problems when a Test match outside India ends within two days thanks to pitches that offer excessive pace and bounce but the other teams should keep their "mouth shut" when pitches start to turn on Day 1 in India. The second Test match in Newlands ended in less than five sessions with records tumbling and history books rewritten. At first, 23 wickets on Day 1 of the Test and then it became the shortest Test match (in terms of overs bowled) after the match was finished in 107 overs before Tea on Day 2. India won the match by seven wickets to square the series but the nature of the pitch became a major talking point. Putting his weight firmly behind the Indian captain, Gavaskar said Rohit was "spot on". "The Indian skipper Rohit Sharma was spot on when he said after the quick finish in the second Test that he doesn't mind playing on pitches like the one dished out there as it's a challenge to play on surfaces different from home," Gavaskar wrote in his column for Mid-Day.

### SUPERFOOD TIGER NUTS : 4 HEALTH BENEFITS OF PERENNIAL WEED



Almonds and other dry fruits are very beneficial for our health. These provide energy along with nutrients. Well, you must have heard the names of many types of dry fruits. But today we are going to tell you about tiger nut. Tiger nut is very popular in America. Let us know what is Tiger Nut and its health benefits. Tiger nut is also called earth almond, chufa nut, or earth nut. It does not taste like almonds and a little like coconut. Talking about minerals, contain nutrients like calcium, copper, iron, magnesium, phosphorus, potassium, and zinc. Along with this, it contains Vitamin C, D and E. Antioxidants are also found in tiger nut which is an important element for your body. What are the benefits of tiger nuts? 1. Will not allow blockage in the heart: Tiger nut keeps you away from heart-related diseases. This bed reduces cholesterol and heart risk. The minerals and fiber present in it keep your heart healthy. Along with this, it also reduces problems like heart attack and stroke. 2. There will be no constipation: Tiger nut is also very beneficial for your digestion. It contains an abundant amount of fiber which keeps your digestive system better. Along with this, by consuming tiger nuts you do not feel hungry again and again, which also reduces fat. 3. Reduces blood sugar: The fiber and antioxidants present in tiger nuts reduce the blood sugar level. That means, with the help of fiber, your body helps in digesting sugar easily. Diabetic patients can consume it. 4. Bones become stronger: Tiger nut contains a high amount of calcium which is enough to strengthen your bones. Along with this, Vitamin D is also present in it to digest calcium, which keeps your body as well as your mental health healthy.

### INFERTILITY AND FOOD : MYTHS THAT CREATE UNNECESSARY PANIC AND STRESS



Millions of couples throughout the world struggle with the complicated and misunderstood problem of infertility. Beyond just not being able to conceive, it can also cause mental distress and social isolation. Infertility can have negative effects on mental health in addition to physical ones, including stress, anxiety, and despair. Age, lifestyle decisions, underlying medical issues, and other factors can all have a major impact on fertility in both men and women. According to Dr Ankita Kaushal, Consultant - Fertility and IVF, Motherhood Fertility & IVF, Kharghar, women often find themselves bombarded with myths and misinformation surrounding infertility and food, leading to unnecessary panic and stress. By dispelling these myths and focusing on holistic approaches to reproductive health, women can alleviate unnecessary anxiety about their dietary choices and potential fertility issues. 1: Eating the core of a pineapple is believed to assist with implantation Fact: Some claim eating the core of a pineapple right after ovulation can aid in implantation. Pineapple cores contain bromelain, a set of enzymes that acts as a blood thinner and has been found to possess anti-inflammatory properties. Nonetheless, there is no concrete evidence from studies to prove that the bromelain in pineapple cores helps with implantation. Also, having fresh pineapple in your diet, rich in Vitamin C and B6 can be a beneficial way to include healthy fruit in your meals. 2: If the couple wants twins, they should eat yam Fact: Yam consumption is believed to play a role due to its natural hormone phytoestrogen, which may stimulate multiple ovulation. However, the high twinning rate is influenced by various factors, not just yams.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

# पंतप्रधान मोदींच्या सभेसाठी ४ हजार पोलीसांचा बंदोबस्त



■पनवेल। प्रतिनिधी,
प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या ठिकाणी भव्य मंडपामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ जानेवारीला सूमारे सव्वा लाख महिलांना संबोधित करणार आहेत. याच कार्यक्रमात विविध सरकारी प्रकल्पांचा उदघाटन सोहळा पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार असल्याने नवी मुंबई पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार आहे. देशाच्या पंतप्रधानांच्या मुख्य उपस्थित होणारा सोहळा यशस्वी व सुरक्षितपणे पार पडण्यासाठी नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी ४ हजारांहून अधिक पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्याचे नियोजन आखले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात महिला पोलीसांचा समावेश असणार आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये होणाऱ्या सोहळ्यात सूरक्षेत कोणतीही ढिलाई राहू नये यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या आहेत.

तीन दिवसांनंतर (१२ जानेवारी) उलवे येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या मैदानावरील भव्य मंडपामध्ये होणाऱ्या कार्यक्रमाच्या पूर्वीपासून बंदोबस्त लावला जाण्याची शक्यता आहे. नवी मुंबई व पनवेलमधील मागील दोन दिवसांपासून वेळेची मर्यादा तोडून चालणाऱ्या लेडीज सर्व्हीस बारवर पोलीसांचे धाड सत्र सुरु झाले आहे. नवी मुंबईत मागील काही दिवसात अवैधपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची धरपकड पोलीसांनी केली आहे. साडेसहा लाख चौरसफुटाचे भव्य मंडप आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या ठिकाणी उभारण्यात आले असून या मंडपात प्रवेशासाठी चार स्वतंत्र प्रवेशद्वार आहेत.

प्रवेशद्वारावर पोलीसांचा कडेकोट पहारा असणार आहे. सामान्य नागरिकांसाठी आणि अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या मंडपापर्यंत येण्यासाठी वेगळे द्वार आहेत. १२०० बसगाड्या उभ्या राहील एवढ्या क्षमतेचे वाहनतळावर पोलीसांची करडी नजर असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मेटल डिटेक्टर यंत्राच्या तपासणीतून मंडपामध्ये प्रवेश दिला जाणार आहे.

# आयकर विभागाची कोणतीही कारवाई नाही, खासदार राजन विचारेंकडून छापेमारीच्या वृत्ताचा इन्कार



■ठाणे। प्रतिनिधी,
ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांच्या घरावर आयकर विभागाने छापेमारी केल्याचं वृत्त समोर आलं होतं. सकाळी ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांच्या निवासस्थानासह सात ठिकाणी ईडीने छापेमारी केली होती. त्यानंतर ठाकरेंच्या दुसऱ्या शिलेदारावर एकाच दिवशी केंद्रीय तपास यंत्रणांची कारवाई झाल्याच्या वृत्तामुळे राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आलं होतं. विशेष म्हणजे शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल अवघ्या काही तासांवर आलेला असताना ठाकरे गटाच्या दोन लोकप्रतिनिधींवर कारवाई होत असल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात होतं. परंतु छापेमारीच्या वृत्ताचा राजन विचारेंकडून इन्कार करण्यात आला.

राजन विचारे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं होमटाऊन असलेल्या ठाणे लोकसभा मतदारसंघातून खासदार आहे. विचारे सलग दुसऱ्यांदा ठाण्यातून लोकसभेवर निवडून आले आहेत.

# डोंबिवलीत महिला डॉक्टरच्या सोन्याच्या ऐवजावर गृहसेविकाचा डल्ला



■डोंबिवली। प्रतिनिधी,
शहरात गृहसेविकांकडून घरात चोरी करण्याचे प्रमाण वाढू लागल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

अशाप्रकारे घरात गृहसेविका चोरी करू लागल्या तर विश्वास ठेवायचा कोणावर आणि कामे करून घ्यायची कोणाकडून, असे प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. येथील एका महिला डॉक्टरच्या घरातून एका गृहसेविकेने सहा लाखाहून अधिक किमतीचा सोन्याचा ऐवज चोरून नेला आहे. मागील दहा वर्षाच्या कालावधीत गोळवली येथील रिजन्सी इस्टेटमधील डेझी इमारतीत डॉ. अश्विनी आशिष सावंत यांच्या घरात हा प्रकार घडला आहे.

या चोरीप्रकरणी डॉ. अश्विनी सावंत यांनी आपल्या घरात काम करणारी दिनदयाळ क्रॉस रस्त्यावरील महात्मा फुले नगर झोपडपट्टीतील उषा वाटोळे या गृहसेविकावर संशय व्यक्त करून तिच्याविरुद्ध मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी तक्रार दाखल करून तपास सुरू केला आहे.

डॉ. सावंत यांच्या घरात काम करत असताना गृहसेविका उषा यांनी डॉ. सावंत यांची नजर चुकवून त्यांच्या घरातील सहा लाख २३ हजार रुपए किमतीचा सोन्याचा ऐवज चोरून नेला. घरात चोरी झाली नसताना ऐवज चोरीला गेला असल्याने सावंत यांनी आपल्या गृहसेविकेवर संशय व्यक्त करून तिच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. मानपाडा पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. गेल्या वर्षभरात डोंबिवली परिसरात सात ते आठ घटनांमध्ये गृहसेविकांनीच घरातून सोन्याचा ऐवज चोरून नेल्याचे प्रकार उघडकीला आले आहेत.

# बदलापूर स्थानकात लोकलचा थांबा बदलला; फलाट एक आणि दोनवर लोकल दीड डब्बा कर्जत दिशेने पुढे थांबणार

■बदलापूर। प्रतिनिधी,
बदलापूर रेल्वे स्थानक होम प्लॅटफॉर्मच्या उभारणीनंतर फलाट क्रमांक एक आणि दोनवर लोकलचा थांबा मंगळवारपासून बदलण्यात आला आहे.पूर्वीच्या थांब्यापेक्षा आता लोकल कर्जतच्या दिशेने दीड डब्बा पुढे थांबणार आहेत. मंगळवारी याबाबतची उद्घोषणा स्थानकात करण्यात येत होती. मात्र बदललेल्या थांब्यामुळे मंगळवारी प्रवाशांचा गोंधळ उडाला. महिला प्रवाशांनी लोकलमध्ये जागा पकडण्यासाठी धावपळ करावी लागली. बदलापूर रेल्वे स्थानकात गेल्या काही वर्षांपासून होम प्लॅटफॉर्मची उभारणी केली जाते आहे. या होम प्लॅटफॉर्मची उभारणी ऑक्टोबर अखेरीस पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते.मात्र अजूनही होम प्लॅटफॉर्मचे काम पूर्ण झालेले नाही. सध्या होम प्लॅटफॉर्मवर अतिरिक्त




पादचारी पुलाची उभारणी सुरू आहे. तर होम प्लॅटफॉर्मवर शेवटचा हात फिरवला जातो आहे. मात्र होम प्लॅटफॉर्ममुळे कर्जतच्या दिशेने फलाट क्रमांक एक आणि दोनची लांबी वाढली आहे. होम प्लॅटफॉर्म उभारण्यापूर्वी फलाट कर्जतच्या दिशेने असलेल्या पादचारी पुलापर्यंत नव्हता. आता मात्र पादचारी पुलाला क्रमांक एक आणि दोन असे दोन्हीही फलाट जोडले गेलेले आहेत. त्यामुळे फलाट क्रमांक एक आणि दोनवर उभ्या राहणाऱ्या लोकल गाड्या कर्जतच्या दिशेने दीड डब्बा पुढे नेऊन उभ्या करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

# गुगल मॅपवर रिव्ह्यूसाठी पैशाचे आमिष, साडेतीन लाखांची फसवणूक

■नवी मुंबई। प्रतिनिधी,
गुगल मॅप वर "write review on google map" द्या आणि प्रति रिव्ह्यू १५० रुपये कमवा असा संदेश सध्या अनेकांना येत आहे. कामोठे येथे राहणाऱ्या एका युवकाने भरपूर पैसे मिळतील या अपेक्षेने काम सुरु केले मात्र पैसे मिळवण्या ऐवजी त्या युवकाची ३ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद झाला असून सायबर विभाग पुढील तपास करीत आहे. कामोठे येथे राहणारे विश्वजित कोळेकर यांच्या मोबाईल वर ६ डिसेंबरला "write review on google map" असा संदेश आला त्यात प्रतिरिव्ह्यू १५० रुपये मिळतील असे नमूद करण्यात आले होते. तसेच एक गुगल लिंक देण्यात आली होती. ती लिंक उघड करून त्यात




रिव्ह्यू लिहून स्क्रीन शॉट पाठवा असे सांगण्यात आले. तसेच स्क्रीन शॉट पाठवल्यावर कंपनीच्या स्वागतिका यांच्याशी टेलिग्राम वर संपर्क करण्यास सांगितले त्याची लिंकही देण्यात आली, त्याप्रमाणे विश्वजित यांनी रिव्ह्यू देत त्याचा स्क्रीन शॉट पाठवला व कंपनी स्वागतिकाशी संपर्क केला. काही वेळाने १५० रुपये ऑनलाईन विश्वजित याला मिळाले. ज्या खात्यातून हे पैसे आले त्यांचे नाव परी मिश्रा असे होते त्यांनी विश्वजित यांना अन्य एका समूहात भरती तसेच ठराविक रिव्ह्यू करण्याचे (टास्क) सांगण्यात आले. असे अनेक रिव्ह्यू दिल्यावर पैसे न आल्याने विश्वजित यांनी संपर्क केला असता प्रीपेड खाते उघडा त्वरित पैसे मिळत राहतील असे सांगण्यात आले.

विविध कारणे देत मागणी केल्या प्रमाणे १० हजार ते ५० हजार असे ९ वेळा पैसे एकूण ३ लाख ६५ हजार रुपये पाठवण्यात आले. मात्र तरीही रिव्ह्यू चे पैसे देण्यात आले नाही तसेच भरलेले तरी पैसे द्या अशी मागणी केली असता संपर्क करणे बंद केले गेले. शेवटी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर विश्वजित यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, पोलिसांनीही तात्काळ कारवाई करीत ज्या खात्यातून पैसे भरले होते ते खाते गोठवले असून त्यात एक लाख रुपये आहेत.

# शहरातील वाहतूक कोंडी सुटणार, वसई विरार शहरातील १२ उड्डाणपूलांचा मार्ग मोकळा

■वसई। प्रतिनिधी,
वसई विरार शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी शहरात १२ उड्डाणपूल आणि ७ रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामांचा प्रस्ताव नव्याने एमएमआरडीएकडे पाठवला आहे. एमएमआरडीएने या कामांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे पुलांच्या निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे.

वसई विरार शहराचे क्षेत्रफळ ३८० चौरस किलोमीटर एवढे आहे. वसई विरार शहरात झपाट्याने नागरीकरण होत आहे. नवनवीन वसाहती विकसित होत आहेत. शहराची लोकसंख्या २५ लाखांच्या घरात गेली आहे. शहरातील रस्ते



अरूंद असून त्यावर वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सर्वाधिक वाहतूक कोंडी ही शहराच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जाण्यासाठी होत असते. शहरातील वाहतूक कोंडीचा अभ्यास करण्यासाठी मेसर्स टंडन अँण्ड कंपनीला सर्वेक्षणाचे काम दिले होते. त्यांनी शहराचे रस्ते, वाढती लोकसंख्या, वाहने यांचा अभ्यास करून आपला अहवाल सादर केला होता. शहरातील भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन प्रमुख नाके आणि रस्त्यांवर १२ उड्डाणपूल बांधण्याचा गरज व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार महापालिकेने १२ उड्डाणपूलांचा पहिला प्रस्ताव २०१४-१५ मध्ये सादर केला होता. त्याचा अपेक्षित खर्च २३९ कोटी ९३ लाख रुपये एवढा होता. मात्र निधी अभावी हे काम रखडले होते.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत महापालिका क्षेत्रातील विकास कामांना विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्ग येणारी कामे बाह्य रस्ते विकास योजनेचे मंजूर धोरणानुसार हाती घेण्याची प्रचलित पध्दत आहे. या योजनेमध्ये मुंबई महागनर स्थानिक स्वराज्य संस्थाना नवीन रस्ते बांधणे, जुन्या रस्त्याचे धोरण मजबुतीकरण, नूतनीकरण व रुंदीकरण करणे इत्यादींसाथी अर्थसहाय्य करण्यात येते. त्यामुळे या धोरणानुसार ही कामे करून घेण्यासाठी वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी शहरात १२ उड्डाणपूल तसेच ७ रस्त्यांच्या कामांचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाला एमएमआरडीए मार्फत मंजुरी देण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती. त्यानुसार पालिकेने प्रस्ताव तयार केला होता.

# पार्टीत शिव्या देण्यावरुन वाद; तरुणाला राग अनावर, रक्तरंजित थरारानं भांडणाला पूर्णविराम



■ठाणे। प्रतिनिधी,
कल्याण-मुरबाड रोडला असलेल्या म्हारळ गावात नशेखोर मित्रांची ओली पार्टी सुरू होती. दारूची पार्टी रंगात आली असतानाच आपापसात शिवीगाळ झाल्याने मित्रांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की संतापाच्या भरात एकाने देशी कट्टयाने गोळी झाडून राजन उर्फ जानू येरकर याची जागीच हत्या केली.

या घटनेनंतर तालुका पोलिसांनी रोहित भालेकर आणि समीर चव्हाण या दोघांना अवघ्या काही तासांतच अटक केली. यातील परवेज शेख आणि सुनिल वाघमारे या दोघांचा पोलीस शोध घेत आहेत. यातील चारपैकी तिघे सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण जवळच्या ग्रामीण भागातील म्हारळ गावात असलेल्या सुर्यानगर परिसरात रोहित भालेकर, परवेज शेख, सुनिल वाघमारे, समिर चव्हाण आणि राजन येरकर हे पाच नशेखोर दारु पित बसले होते. दारु पार्टी सुरु असताना आपापसात शिवीगाळझाल्याने राजन आणि एका मित्रामध्ये वाद झाला. याच दरम्यान संतापलेल्या रोहित भालेकर याने परवेजच्या कमरेला खोचलेल्या देशी कट्टयातून राजन येरकर याच्यावर गोळी झाडली.

या गोळीबारात राजन येरकर हा घटनास्थळीच ठार झाला. या प्रकरणी टिटवाळ्यातील तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरिक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप शिंगटे यांच्या पथकाने रोहित भालेकर आणि समिर चव्हाण या दोघांना अटक केली.

# केवायसी करा नाहीतर खातं बंद होईल, बँकेतून बोलत असल्याची बतावणी



■ठाणे। प्रतिनिधी,
बँकेतून अधिकारी बोलत असल्याचे सांगत केवायसी न केल्याने बँक खाते बंद होईल, अशी बतावणी करून सायबर गुन्हेगारांनी व्हॉट्सॲपवरून व्हिडीओ कॉल केला. नंतर मोबाइल हॅक करून एका दाम्पत्याच्या बँक खात्यामधून ऑनलाइनद्वारे सात लाख परस्पर काढून घेतल्याचा प्रकार ठाण्यात समोर आला आहे. या प्रकरणी कापुरबावडी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. विमा कंपनीत काम करणारे संजय (तक्रारदाराचे नाव बदलले आहे) ठाण्यातील माजिवाडा परिसरात राहतात.

त्यांना अमित कुमार नामक व्यक्तीचा फोन आला. त्याने बँकेचा अधिकारी असल्याचे भासवत तुमचे बँक खाते बंद होणार असल्याचे सांगत संजय यांच्याकडे जन्मतारखेची विचारणा केली. पत्नीच्या बँक खात्याचे शेवटचे चार क्रमांक आणि पॅन कार्ड नंबरही अमितने सांगितल्याने संजय यांचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला. मग त्यांनी त्याला जन्मतारीख आणि इतरही माहिती दिली. नंतर संजय यांच्या ईमेल आयडीवर ओटीपी नंबर आला. मात्र, त्यांच्या मोबाइलला रेंज नसल्याने अमितने व्हॉट्सॲपवरून व्हिडिओ कॉल करत त्यांना बँकेचा लोगो पाठवला.

# ठाण्यात क्रीडा स्पर्धांमधून 'राजकीय फटकेबाजी'; बड्या नेत्यांसह स्थानिक पदाधिकाऱ्यांचेही ब्रॅण्डिंग

■ठाणे। प्रतिनिधी,
मुख्यमंत्री चषक...नमो चषक महोत्सव...केंद्रीय राज्यमंत्री चषक...धर्मवीर आनंद दिघे चषक...नजीब मुल्ला ट्रॉफी या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांकडून आयोजित केलेल्या क्रीडा चषक आणि स्पर्धांची ठाणे जिल्ह्यात जोरदार चर्चा सुरु आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून स्वतःसह पक्षाची ओळख जनमानसात रुजवण्यासाठी या स्पर्धांमधून 'राजकीय फटकेबाजी' केली जात आहे. त्यामुळे त्या पक्षाच्या बड्या नेत्यांसोबत स्थानिक पदाधिकाऱ्यांचे ब्रॅण्डिंग होतेच.


मात्र या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या संघांना मोठमोठ्या रकमांची आकर्षक बक्षिसे आणि जिल्हास्तरीय व्यासपीठावर चमकण्याची नामी संधी मिळत आहे. आगामी लोकसभा निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. तर त्यानंतर विधानसभा निवडणूकांचीही धामधूम सुरु होणार आहे. पक्षांची फाटाफूट आणि नव्या राजकीय समीकरणानंतर आपण नेमका कोणता



'झेंडा' हाती घेतला आहे, हे दाखवून देण्याची नामी संधी या स्पर्धांमधून राजकीय नेते मंडळींना मिळाली आहे. त्यामुळे गेल्या महिन्यात ठाण्यात झालेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद मुख्यमंत्री चषक कबड्डी स्पर्धेतून खेळाच्या मैदानातून 'राजकीय धुरळा' उडण्यास प्रारंभ झाला. या स्पर्धेचे आयोजन राष्ट्रवादीमधून शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केलेल्या माजी नगरसेवक हणमंत जगदाळे यांनी केले होते. मात्र नव्या वर्षाच्या सुरवातीपासूनच खऱ्या अर्थाने या स्पर्धांच्या आयोजनाची जोरदार फटकेबाजी शहरात सुरु झाली.

# डोंबिवलीत कुटुंबाला मारहाण, महिलेचे कपडे फाडले; रुग्णालयात जाऊन अश्लील शिवीगाळ

■डोंबिवली। प्रतिनिधी,
डोंबिवली पूर्व येथील चोळेगाव परिसरात एका इमारतीत घडलेला भीषण प्रकार सध्या समोर आला आहे. तक्रारदार सदानंद सालियन यांनी रामनगर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या इमारतीतील कुटुंबाने त्यांच्यासह पत्नीवर हल्ला केल्याचे वृत्त आहे. आरोपी कुटुंबाने सदानंद यांच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे समजतेय. तक्रारपत्रात समोर आलेल्या माहितीनुसार, सदानंद सालियन हे मागील १० वर्षांपासून या इमारतीत राहतात. अलीकडेच त्यांनी इमारतीचे सचिव



पद स्वीकारले होते. मागील चार महिन्यांपासून इमारतातीत पाण्याची अडचण जाणवत होती यावरून ६ जानेवारीला इमारतीच्या टेरेसवर एक मीटिंग चालू होती. मीटिंगमध्ये सदानंद सालियन व उजाला अंकुश पाटील अशा दोघांमध्ये किरकोळ वाद झाला होता त्यानंतर सालियन यांच्यावर उजाला त्यांची पत्नी अमृता व भाऊ रोहित पाटील यांनी हल्ला करत मारहाण केली.

यावेळी सालियन यांच्या पत्नीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या अंगावरील कपडे फाडून अश्लील भाषेत शिवीगाळ केला गेला. तसेच सालियन दाम्पत्याला बिल्डिंगच्या जिन्यात ढकलून देत त्यांच्यावर विटा व लाकडी फ्रेम सुद्धा फेकण्यात आली होती. या हाणामारीदरम्यान सालियन यांच्या पत्नीस गंभीर दुखापत झाली असल्याची तक्रार सदानंद यांनी पोलिसांकडे केली आहे.

सदर प्रकरण ६ जानेवारी २०२४ रोजी घडल्याचे समजतेय. सालियन यांनी यासंदर्भात खात्यावर व्हिडीओ शेअर करत मुख्यमंत्री शिंदेंसह पोलिसांना सुद्धा टॅग केले आहे. तक्रारपत्रात असणारा उल्लेख व सालियन यांच्या खात्यावर दिसणाऱ्या व्हिडीओनुसार, सालियन आपल्या पत्नीच्या उपचारासाठी त्यांना घेऊन दवाखान्यात गेले असता आरोपी पाटील कुटुंबाने सालियन यांच्या गाडीची सुद्धा तोडफोड केली.

कशामुळे झाला वाद?

तक्रारपत्रानुसार, सदानंद सालियन हे राहत असलेल्या इमारतीत रोहित व उजाला यांच्या वडिलांच्या नावे एक फ्लॅट आहे जो सध्या भाड्याने देण्यात आला आहे.

# अयोध्येतील राम लल्लाच्या मूर्तीचे ठाणे कनेक्शन; बदलापूरच्या चित्रकाराने मूर्तीसाठी तयार केलं चित्र

■बदलापूर। प्रतिनिधी,
बदलापुरात राहणारे ज्येष्ठ चित्रकार सचिन जुवाटकर यांनी अयोध्येतील राम लल्लाच्या मुख्यमूतीर्साठी चित्र साकारले आहे. या चित्राचा काही भाग मूर्ती साकारताना स्वीकारण्यात आला आहे. देशभरातील दिग्गज चित्रकरांकडून राम लल्लाच्या मूतीर्साठी चित्र मागवण्यात आले होते. त्यात सचिन जुवाटकर यांच्याही चित्राचा समावेश होता. अयोध्येत साकारण्यात आलेल्या राम मंदिरातील मुख्य गाभाऱ्यात राम लल्लाच्या मूतीर्ची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

या मुख्य मूतीर्चे कोरीव काम



करण्यासाठी देशभरातील दिग्गज चित्रकारांना राम लल्लाचे चित्र रेखाटण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार देशभरातील अनेक चित्रकारांनी मूर्ती तयार करण्यासाठी आपल्या कल्पकतेचा विचार करून चित्र साकारले. मात्र समितीने या चित्रांचे परीक्षण केल्यानंतर देशभरातील चार चित्रकारांचे चित्र स्वीकारले. त्यात मुंबईचे वासुदेव कामत आणि बदलापूरचे सचिन जुवाटकर यांच्या चित्राचा समावेश होता. तर समितीशी संलग्न असलेले चित्रकार विश्वकर्मा यांच्या देखील चित्राचा महत्त्वाचा भाग मूर्ती तयार करताना स्वीकारण्यात आला. देशभरातील चार दिग्गज कलाकारांनी साकारलेल्या चित्राच्या आधारावरच अयोध्येतील राम लल्लाची मूर्ती साकारण्यात आली आहे. ज्यांच्या देखरेखीखाली राम मंदिराची उभारणी केली जात आहे.

ते डॉक्टर सच्चिदानंद जोशी यांच्यामुळेच आपल्याला राम लल्लाची सेवा करण्याची संधी मिळाल्याची प्रतिक्रिया जुवाटकर यांनी दिली. राम मंदिराची मूर्ती स्थापन करण्यात येणार आहे. ती मूर्ती पाच ते सहा वर्ष वयोगटातील रामाची मूर्ती असून त्या वयोमानानुसारच चित्र साकारण्यात आले होते. जुवाटकर यांनी राम राम लल्लाचे रेखाटलेले चित्र आपल्या प्रेझेंटेशनच्या माध्यमातून समितीकडे सादर केल्यानंतर त्यांच्या सूचनांचा आदर समितीने केला. जी मूळ मूर्ती साकारण्यात येत आहे त्यात जुवाटकर यांनी आपल्या प्रेझेंटेशनच्या माध्यमातून केलेल्या काही सूचनांचा देखील सहभाग करून घेण्यात आला आहे.

# शहापूर तालुक्यातील गावे, वाड्यांमध्ये पाणी टंचाईला सुरूवात

■कल्याण। प्रतिनिधी,
विहिरी, विंधन विहिरी, नैसर्गिक स्त्रोत आटू लागल्याने शहापूर तालुक्याच्या ग्रामीण, आदिवासी पाड्यांवर पाणी टंचाईला सुरूवात झाली आहे. गावापासून एक ते दोन किलोमीटर जाऊन महिलांना डोक्यावरून पाणी आणावे लागते. आता जून-जुलैपर्यंत ही पाणी टंचाईची परिस्थिती राहणार असल्याने महसूल, जिल्हा परिषद प्रशासनाने शहापूर तालुक्यासाठी तयार केलेल्या पाणी टंचाई कृती आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करावेत, अशी जोरदार मागणी तालुक्यातील नागरिकांकडून केली जात आहे.

शहापूर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र डोंगर उताराचे आहे. पावसाळ्यात पडलेले पावसाचे बहुतांशी पाणी



नदी, डोंगर माथ्यावरून वाहून जाते. गाव हद्दीतील धरणांचे पाणी जलसिंचनासाठी वापरले जाते. यात भाजीपाल्याची लागवड अधिक प्रमाणात केली जाते. मे अखेरपर्यंत ही लागवड सुरू राहते. त्यामुळे पिण्यासाठी नदी, ओहळांमधून मुबलक पाणी उपलब्ध होत नाही, अशा तक्रारी ग्रामस्थांनी केल्या. शहापूर तालुक्यातील पाणी टंचाई कायमची संपवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मागील वर्षी कृती आराखडा तयार केला आहे. या आराखड्याची स्थानिक पातळीवर प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत. दरवर्षी तालुक्यातील पाणी पुरवठ्यासाठी कोट्यवधी रुपए खर्च होत असताना पाणी टंचाई निर्माण होते कशी, असे प्रश्न जिल्हा प्रशासनाकडून उपस्थित करण्यात आल्याने स्थानिक तालुका प्रशासन अडचणीत आले आहे, असे एका तालुका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी खासगी विहिरी, विंधन विहिरी ताब्यात घेणे, विहीर, नदी, गावातील ओहाळातील गाळ काढून पाणी टंचाईचा प्रश्न स्थानिक पातळीवर तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने केल्या आहेत. कसारा खोऱ्यातील शिरोळ घाटमाथ्यावर कुंडण धरण आहे. या धरणात एक हजार ५६२ घन मीटर पाणी साठा आहे. या धरणातून परिसरातील १०२ हेक्टर क्षेत्रात जलसिंचन होते. या धरणातून कसारा परिसरातील वाशाळा, फुगाळे, खर्डी, अजनूप, गायदरा गावांना पाणी पुरवठा केला जातो. या धरणाच्या अधिग्रहणाचा प्रश्न सध्या अनिर्णित आहे. या धरणाच्या अधिग्रहणाचा प्रश्न प्रलंबित राहिला तर कसारा परिसरातील गावांना भातसा नदीतून पाणी पुरवठा करावा लागणार आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

मागील ५५ वर्षात भातसा नदीतील पाण्यातून तालुक्यातील टंचाई ग्रस्त गावांना पाणी पुरवठा केला जातो, असे तालुका पंचायत समितीमधील अधिकाऱ्याने सांगितले.

